# संत भक्तराज महाराज यांचे चरित्र : खंड ३
# संत भक्तराज महाराज आणि त्यांचे शिष्य, इतर संत अन् देवता

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**

### प्रकरण १
### प.पू. भक्तराज महाराज ( बाबा ) यांचे शिष्य


१. गुरुवासी भाऊ (विठ्ठल) बिडवई (प.पू. अच्युतानंद) ९
(कौटुंबिक जीवन, स्वभाव, गुरुप्राप्ती, गुरुसेवा, देहत्याग इत्यादी)
२. श्री. रामजीदादा (रामचंद्र) लक्ष्मण निरगुडकर (प.पू. रामानंद) १३
३. सौ. अक्का (सुशीलाबाई) रामचंद्र निरगुडकर १४
४. गुरुवासी हरिभाऊ बापूजी लांभाते व कुटुंबीय १४
५. श्रीमती शांताबाई रामचंद्रराव लांभाते १६
६. श्री. नाना (कृष्णराव) नागेश पोळ १८
७. गुरुवासी इंदिराबाई कृष्णराव पोळ २०
८. गुरुवासी गणपतराव पवार २१
९. गुरुवासी विजय बापूजी लांभाते २२
१०. घळसासी कुटुंबीय २२
११. श्री. मामा (नारायण) व गुरुवासी (सौ.) शीलाबाई नारायण उज्जैनकर २४
१२. श्री. राजू (लोकेश) रामचंद्र निरगुडकर २६
१३. कु. सीमा राजाभाऊ गरुड २६
१४. श्री. नरेंद्र धाकड २८
१५. डॉ. जयंत बाळाजी आठवले व डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले ३१

## प्रकरण २

## प.पू. भक्तराज महाराज ( बाबा ) व इतर संत


१. सहजतेने वागणे ३६

२. संतांच्या पातळीनुसार वागणे ३७

३. संतांची गूढ भाषा ३८

४. बाबांचे शिष्यत्व पत्करणारे संत ३८

५. बाबांनी अनुभूती दिलेले संत ३९

६. बाबांचा आदर करणारे संत ४८

७. संतांनी बाबांना न ओळखणे ५४

८. संतांबद्दल शिष्यांना शिकविणे ५६

९. बाबा व अन्य संत यांच्या संदर्भात बाबांच्या एका भक्ताला आलेल्या अनुभूती ५७

१०. तीर्थक्षेत्री सन्मान ५७

११. संतासंतांचा पत्रव्यवहार ६०

१२. बाबांशी गाठीभेटी झालेले संत ८५

१३. काही संतांची बाबांना आदरांजली ८८


## प्रकरण ३

## प.पू. भक्तराज महाराज ( बाबा ) व देवता


१. बाबा व क्षुद्रदेवता ९१

२. बाबा व एका दैवी शक्तीने घेतलेले रूप ९३

३. बाबा व नर्मदामैया ९३

४. बाबा व चंद्रभागा ९४

५. बाबा व पांडुरंग ९५

६. बाबा व श्री बालाजी ९६

# मनोगत

## पहिल्या आवृत्तीचे मनोगत

### १. चरित्रलिखाणाचा विचार

आमच्या संस्थेतर्फे ‘अध्यात्मशास्त्र’ या विषयावरील अभ्यासवर्ग दर महिन्याला ठिकठिकाणी घेतले जातात. त्या वर्गांची व त्यांना उपस्थित रहाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. संस्थेच्या कार्यामागची प्रेरणा प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) यांची असल्याचे आम्ही सर्वांना सांगत असल्याने ‘बाबांचे चरित्र वाचायला मिळावे’, असे बऱ्याच जिज्ञासूंना वाटत होते. त्यांच्या या मागणीची पूर्तता करण्यासाठी आम्ही बाबांचे चरित्र लिहायचे ठरविले.

### २. पद्य कि गद्य ?

चरित्र लिहायचे ठरविल्यावर ‘ते पद्यात लिहावे कि गद्यात’, हा प्रश्न आमच्या मनात निर्माण झाला. जुन्या काळातील अध्यात्मातील बहुतेक सर्व लिखाण पद्याच्या गेयतेमुळे व नादशक्तीमुळे पद्यात आहे. ‘आपल्याला तर पद्यात लिहिता येत नाही. आता काय करायचे ?’, हा प्रश्न मनात उभा राहिला. बाबांनी तोही प्रश्न सोडविला. १९९१ साली आम्ही श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला बाबांबरोबर गेलो होतो. त्यांच्याबरोबर मोटारीमधून परततांना बाबांवर सुंदर ओवीबद्ध रचना सुचली.

### ३. ग्रंथाचे नाव

दैनंदिन जीवनात बाबा ७० टक्के वेळा ‘गुरु’ म्हणून व ३० टक्के वेळा ‘संत’ म्हणून कार्य करीत असले, तरी त्यांच्या गुरुपदाचा फायदा फारच थोडे जण घेतात. त्यांच्याकडे येणाऱ्या हजारो लोकांपैकी बहुतेक जण ‘संत’ म्हणूनच त्यांच्याकडे येतात. यासाठीच ग्रंथाच्या नावामध्ये ‘संत भक्तराज’ असे लिहिले आहे.

### ४. चरित्रलेखनाची पद्धत

बाबांचे आचरण कसे होते, त्यातून साधकांना काय शिकता येईल, या दृष्टीने चरित्र लिहायचे, असे आम्ही ठरविले. स्थूलातील तपशिलांना कमी महत्त्व द्यायचे ठरवून चरित्रातील जास्तीतजास्त भाग शिष्यांना, साधकांना उपयुक्त होईल असा लिहायचा, या दृष्टीने हे चरित्र लिहिले आहे. ‘अध्यात्म’ या विषयाकडे आम्ही ‘शास्त्र’ या दृष्टीने पहात असल्याने व हे चरित्र अध्यात्मातील एका

अधिकारी व्यक्तीचे असल्यामुळे चरित्र नेहमीच्या गोष्टीरूप भाषेत न लिहिता शास्त्रीय भाषेत लिहिले आहे.

## ५. स्वचरित्राबद्दल बाबांचे विचार

हे चरित्र माझे नाही. हे चरित्र सद्‌गुरु अनंतानंदांचे आणि माझ्या भक्तांचे आहे. त्यांच्या चरित्रात माझे चरित्र दडले आहे. माझे खरे चरित्र म्हणजे भजन. **– संकलक**

## विभाजित तिसऱ्या खंडाच्या आवृत्तीचे मनोगत

बाबांच्या अमृतमहोत्सवाच्या प्रसंगी चरित्राची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. अमृतमहोत्सवाची गडबड संपल्यावर चरित्र वाचून घेतांना बाबांनी काही नवीन माहिती सांगितली, तसेच काही प्रसंगांचे विश्लेषण केले. तो सर्व भाग चरित्राच्या सुधारित आवृत्तीत घ्यायचा होता. बाबांच्या देहत्यागानंतरही त्यांच्याविषयीच्या माहितीचे आणखी काही मुद्दे त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या काही भक्तांकडून मिळत गेले. तेही मुद्दे सुधारित आवृत्तीत घ्यायचे होते; पण यामुळे सुधारित आवृत्तीची पृष्ठसंख्या खूप वाढू शकली असती; म्हणून चरित्रचे विषयांनुसार आता पाच खंडांमध्ये विभाजन केले आहे.

प्रस्तूत खंडात बाबांचे शिष्य प.पू. अच्युतानंद यांची खडतर साधना, काही संतांनी बाबांना न ओळखणे, संतासंतांचा पत्रव्यवहार, बाबांचे शिष्यत्व पत्करणारे व त्यांचा आदर करणारे संत, बाबांचा तीर्थक्षेत्री झालेला सन्मान व देवतांनी बाबांसाठी प्रकट होणे इत्यादींविषयी माहिती दिली आहे.

हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला सुरुवात करावी, अशी श्रीगुरुचरणी प्रार्थना.

**– संकलक**